दि. 14/03/2018

# श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ

## जवाहरलाल दर्डा श्रोतृगृह वापरा बाबतची नियम व अटी.

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ अधिनिस्त असलेले श्रोतृगृह सुविधा ठराविक शुल्क आकारुन बाहेरील संस्थाना भाडे तत्वावर उपलब्ध करुन दयावयाचे भाडे / सेवाशुल्काचे दर

| अ.क्र. | उपलब्ध सुविधा | सेवाशुल्क | कालावधी | भाडे व्यतिरिक्त अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ४०००/- प्रतिदिवस | |
| १ | श्रोतृगृह | ९,०००/- | प्रतिदिवस | | |
| २ | विद्युत | १०००/ | प्रतिदिवस | | |
| ३ | पाणि | १०००/ | प्रतिदिवस | | |

१.एकुण रक्कम रुपये ११०००/- अनामत रु.४०००/- एकुन रक्कम रु.१५०००/-प्रतिदिवस

२.ज्या दिवसाकरीता श्रोतृगृह आरक्षित केले आहे त्याच दिवशी पुर्ण कार्यक्रम संपल्यानंतर श्रोतगृह व परिसर स्वच्छ करुन सांयकाळी त्याच दिवशी ताब्यात देण्यात यावे अन्यथा एक दिवसाचे जास्तीचे शुल्क आकारण्यात येईल, आदल्या दिवशी वापरल्यास त्याचेही वेगळे शुल्क दयावे लागेल.

३.श्रोतृगृहाच्या बाहेरील जागा वापरल्यास उदा. दुकाने स्टॉल्स ईत्यार्दीचे वेगळे शुल्क रुपये ५०००/- प्रति दिवस आकारण्यात येईल.

४.हॅलोजन बल्ब लावल्यास प्रती बल्ब १००/- रु प्रती दिवस आकारण्यांत येईल.

५.जनरेटरला लागणा-या इंधनाचा खर्च करण्याची जबाबदारी आयोजकांची राहील.

६.कार्यक्रमाकरिता लागणारे माईक व साऊंड सिस्टीमची व्यवस्था आयोजकांनी स्वत: करावी

७.सदरहु श्रोतृगृह हे व्यावसायिक कार्यक्रमासाठी उपलब्ध होणार नाही.श्रोतृगृहाच्या सुजबी देखभालीकरिता (विद्युत पुरवठा, साफसफाई इत्यादी खर्च भागविण्याकरिता ) शासनावर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडु नये या करिता शैक्षणिक कार्यक्रमासाठी सदरहू श्रोतृगृह खालील अटीच्या अधिन राहून उपलब्ध होईल.

८.कार्यक्रम रद्द झाल्यास खालील प्रमाणे रक्कम परत करण्यांत येईल

| अक्र | कालावधी | जमात करण्यांत येणारी रक्कम | परत करण्यांत येणारी रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०७ दिवस अगोदर रद्द केल्यास | ३० टक्के (रु. २७००/- प्रतिदिवस) | ७० टक्के(रु. ६३००/-प्रतिदिवस) | ७० टक्के अधिक अनामत रक्कम रु ४०००/- परत |
| ०२ | ०२ दिवस अगोदर रद्द केल्यास | ५० टक्के (रु. ४५००/-प्रतिदीवस) | ५० टक्के (रु. ४५००/-प्रतिदीवस) | ५० टक्के अधिक अनामत रक्कम रु ४०००/- परत |
| ०३ | २४ तास अगोदर रद्द केल्यास | १०० टक्के (रु. ९०००/- प्रतिदीवस) | निरंक | फक्त अनामत रक्कम रु ४०००/- परत करण्यांत येईल |

Received
[illegible] 2018

Scanned by CamScanner

श्रोतृगृहाचे आरक्षण वर नमुद केल्यानुसार रद्द केल्यानंतर परत करण्यांत येणारी रक्कम ही १० दिवसा नंतरच संबंधितास अदा करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

९.कार्यक्रम ऐन वेळेवर रद्द झाल्यास त्याला सर्वस्वी जबाबदार आयोजक राहील व भरलेले भाडे परत मिळणार नाही,

१०.श्रोतृगृहातील वस्तुची उदा.खुर्च्या,लाईट,लाईट,पडदे व इतर फर्निचर तुटफट झाल्यास त्याला सर्वस्वी जबाबदार आयोजक राहील व भरपाई रक्कम संस्थेनी ठरविल्यानुसार दिलेल्या अनामत रक्कमेतुन वजा करण्यात येईल.

११.श्रोतृगृहात कुठलेही पोस्टर्स लावण्यास किंवा खिळे ठोकण्यास मनाई आहे. तसेच ज्यामुळे श्रोतृगृहाच्या सौंदर्याला बाधा येईल असे कोणतेही कृत्य करता येणार नाही. केल्यास त्या बाबतच्या दुरुस्तीचा खर्च अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

१२.रात्री १० नंतर ध्वनीक्षेप, बॅन्ड श्रोतृगृहात वापरता येणार नाही.

१३.श्रोतृगृह हॉल मध्ये कुठलेही खादयपदार्थ आणता येणार नाही.

१४.श्रोतृगृहाच्या बाहेर ध्वनी प्रक्षेपक लावण्यात येउ नये.

१५.कार्यक्रमासाठी येणारे वाहन व्यवस्थित रित्या आतील परिसरातच पार्क करण्यात यावे,जेणेकरुन रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. त्यासाठी आयोजकांनी एका व्यक्तीची नियुक्ती करावी.

१६.कार्यक्रमासाठी येणा-या लोकांना संस्थेच्या परिसरात अनावश्यक फिरण्यास सक्त मनाई राहील.

१७.कार्यक्रमासाठी आलेल्या व्यक्तीने अनुशासन पाळणे आवश्यक आहे. व त्यांची सर्व जबाबदारी आयोजकांची असेल.

१८.श्रोतृगृहामध्ये तसेच संस्थेच्या परिसरात धुम्रपान,मद्यपान, तंबाखु व आम्ली पदार्थाचा वापर तसेच असभ्य वर्तणूक करता येणार नाही.याची आयोजकांनी खबरदारी घ्यावी.

१९.या कार्यालयातर्फे कोणतेही मनुष्य बळ उपलब्ध करुन देण्यांत येणार नाही.

२०.कार्यक्रमा पूर्वी व नंतर श्रोतगृह व लगतचा परिसर स्वच्छ करण्याची जबाबदारी आयोजकांची राहील. जर स्वच्छता न केल्यास यावर होणारा खर्च अनामत रक्मेतुन वसुल करण्यात येईल.

२१.वरिल प्रमाणे आकारण्यांत येणा-या दरामध्ये काहीही बदल होणार नाही, याकरिता कोणाचीही शिफारस स्विकृत केल्या जाणार नाही, तसे केल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही केल्या जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

अधिष्ठाता,
श्री.व.ना.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ

मी..............................................वरील नियमावली वाचलेली असुन ती मला मान्य आहे. त्याअंतर्गत राहुन मी श्रोतृगृहाचे आरक्षण करीत आहे.

राही,संपूर्ण नाव व
हुददा व पत्ता
मो. नंबर

यवतमाळ:
दिनांक

प्रत :- ① रोखपाल श्री. व. ना. शा. वै. महाविद्यालय, यवतमाळ, यांना कार्यवाही करीता.

Scanned by CamScanner